आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)

बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६

ठळक बातम्या....

1. ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रिम मदत जमा झाल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

2.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत आज ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत ४ हजार ७६४ कोटी रुपये जमा

3.नागपुरातील कृषि महाविद्यालयाच्या दाभा येथील जागेवर ६४४ कोटी ६३ लाख रुपयांच्या आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्रास मंजूरी

4.सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामील करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारची मान्यता

5.न्यूझीलंड विरोधातल्या ५ सामन्यांच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत भारतीय संघाची विजयी सलामी

अग्रीम मदत

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील ७३ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रिम मदत जमा करण्यात आली आहे. येत्या दोन दिवसांत ९५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यांत ही मदत जमा होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याची घोषणा महायुती सरकारने केली होती. त्यानुसार मदतीचे वितरण सुरू आहे.तसच, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत आज पुन्हा ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत ४ हजार ७६४ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक २ लाख ७६ हजार शेतकरी मराठवाड्यातील आहेत. आतापर्यंत मराठवाड्यातील एकूण २१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण १९ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी वितरित करण्यात आली आहे.कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांच्या याद्यांचे प्रमाणीकरण अद्याप सुरू असून, प्रमाणीकरण पूर्ण होताच संबंधित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा केली जाईल. महायुती सरकार विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.दरम्यान, राज्यातील सर्व मंत्री यंदा गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

सहकारी संस्था

राज्यातल्या ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल पाचशे कोटीहून जास्त आहे, अशा संस्थांच्या समित्यांवर शासनातर्फे ५ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यासंबंधीचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाला. सहाय्यक निबंधक पदावरचा किंवा समकक्ष अधिकारी, आणि संस्थेच्या कार्याचा अनुभव असणाऱ्या ४ व्यक्तींची नेमणूक समितीवर होणार आहे. या ४ सदस्यांना संचालक मंडळात मताधिकार असेल परंतु, पदाधिकारी पदाची निवडणूक त्यांना लढवता येणार नाही. ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना लागू नसेल.पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता भत्त्यामध्ये वाढ करण्याचा, वाहनांवरील दंडासाठी अभय योजना राबवण्याचा तसंच वसतिगृहातल्या ओबीसी, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ करण्याचा निर्णयही आज घेण्यात आला.डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या नागपूर येथील कृषि महाविद्यालयाच्या दाभा येथील जागेवर आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्रास मंजूरी देण्यात आली असून या केंद्राच्या ६४४ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता मिळाली आहे. याशिवाय नागपूर जिल्ह्यातील नगर पंचायत बिडगाव तरोडी (खुर्द) पांढुर्णा, तालुका कामठी यांना १ हेक्टर ८६ आर जमीन देण्यास मंजूरी देण्यात आली असून नगर पंचायतीला प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी जमीन देण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. गोंदिया शहरामधील लिलावाद्वारे अथवा भाडेतत्त्वावर घरांसाठी दिलेल्या जमिनीचे रुपांतरण विनामूल्य वर्ग - १ मध्ये करण्यास देखील मंजूरी देण्यात आली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील पाणीटंचाईच्या कामांची मागील दोन वर्षांतील थकीत बिले २० नोव्हेंबरपर्यंत अदा करण्याचे निर्देश दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह इथं झालेल्या बैठकीत जलजीवन मिशनची अपूर्ण कामे, चारा उपलब्धता, फळबाग संरक्षण आणि दुष्काळी उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. रोजगार हमी योजनेंतर्गत व्हीबी-जी

रामजीमधील मजुरांचे दर वाढविण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, दहा दिवसांत निर्णय घेण्यात येणार आहे.

माध्यम परिषद

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त झाल्यानंतर केवळ भौतिक सुविधांऐवजी नागरिकांमध्ये सकारात्मक बदल आणि आर्थिक सुबत्तेच्या संधी निर्माण करण्याला शासनानं प्राधान्य द्यावं, असं मत ज्येष्ठ पत्रकार कार्तिक लोखंडे यांनी व्यक्त केलं. पत्र सूचना कार्यालय आणि पोलीस विभागातर्फे गडचिरोली पोलीस मुख्यालयात आयोजित 'नक्षलमुक्त भारत' विषयावरील माध्यम परिषदेत ते बोलत होते. यावेळी नक्षलविरोधी अभियानाचे पोलीस उपमहानिरीक्षक योगेशकुमार, पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्यासह पत्रकार, पोलीस अधिकारी आणि अभ्यासक उपस्थित होते.

अग्नीवीर

सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. सध्याच्या योजनेनुसार ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर २५ टक्के अग्नीवीरांना सैन्य दलात सामील केलं जातं. उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना सरकारनं २ वर्षांची मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर यापैकी इच्छुक असलेल्या अग्नीवीरांना सैन्य दलात नियमित स्वरुपात घेतलं जाईल, अशी माहिती सैन्यदल प्रमुख एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली. देशात ९२ गीगावट क्षमतेच्या ऊर्जा साठवणूक योजनेला केंद्र सरकारनं मंजुरी दिल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. याशिवाय विविध योजनांसाठी योग्य माहिती उपलब्ध व्हावी याकरता सरकारनं सांख्यिकी क्षेत्रात सुधार करणार आहे. बाल लैंगिक अत्याचार आणि बलात्कार पीडितांचे खटले चालवण्याचे साडे आठशे जलदगती न्यायालयाचं सक्षमीकरण करायचा निर्णय सरकारनं घेतल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली.

एटीएस तपास

अमरावती जिल्हा आणि सत्र न्यायालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या इमारती बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीप्रकरणी तपास दहशतवादविरोधी पथकाकडे सोपविण्यात आला आहे. २ नोव्हेंबर रोजी ई-मेलद्वारे दुपारी ३ वाजून ११ मिनिटांनी आयईडी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर बॉम्बशोधक आणि श्वान पथकांनी दोन्ही इमारतींची तपासणी केली; मात्र कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. खबरदारी म्हणून न्यायालय परिसरातील सुरक्षा

व्यवस्था वाढविण्यात आली असून, मंगळवारपासून न्यायालयाचं कामकाज नियमित सुरू झालं आहे.

वासुदेव बळवंत फडके जयंती

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले आद्यक्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके यांची आज जयंती. ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र बंड पुकारणारे पहिले क्रांतिकारक म्हणून ते ओळखले जातात. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वासुदेव बळवंत फडके यांना आदरांजली वाहिली. फडके हे स्वातंत्र्यासाठी आणि आत्मसन्मानाच्या रक्षणासाठी लढलेल्या असंख्य क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान होते असं शाह यांनी सामाजिक माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या एक दिवसीय सामन्यात भारतीय संघ पाच गडी राखून विजयी झाला. न्यूझीलंडच्या संघाने ४० षटकांत सर्वबाद १८५ धावा केल्या. पावसामुळे सामना ३२ षटकांचा करण्यात आला आणि भारताला विजयासाठी डकवर्थ लुईस पद्धतीने १४३ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. भारताने २२ षटक आणि ४ चेंडूत हे लक्ष साध्य करत पहिल्या सामन्यात विजय मिळवला. भारतातर्फे सर्वाधिक ७४ धावा विराट कोहलीने केल्या, तर २२ धावांमध्ये दोन गडी टिपणारा अंशुल कंबोज याला सामनावीराचा मान मिळाला.

हवामान

हवामान - विदर्भात आज यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान नोव्हेंबरच्या सुरुवातीपासूनच सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात किंचित घट जाणवत असून आज सर्वात कमी किमान तापमान यवतमाळ जिल्ह्यात 17 पूर्णांक चार दशांश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत देखील तापमान 20 अंश सेल्सिअसच्या खाली आहे. दरम्यान उद्या यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

नवनियुक्त वैद्यकीय अधिकारी

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागात एकाच वेळी १ हजार ४४० नवनियुक्त वैद्यकीय अधिकारी सेवेत दाखल होत असल्याने आरोग्य यंत्रणेला मोठे बळ मिळणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या नियुक्ती आदेश वितरण समारंभात ते मुंबईत बोलत होते. या नियुक्त्यांमध्ये सुमारे ७०० महिला डॉक्टरांचा समावेश आहे. नव्या डॉक्टरांमुळे विशेषतः ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतून १२ कोटी ५० लाख नागरिकांना विमा संरक्षण दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

अन्ननमुने विश्लेषण

चंद्रपूरमध्ये सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनाने ९२ आस्थापनांची तपासणी करून १७० अन्ननमुने विश्लेषणासाठी घेतले. अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ५१ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आली असून, १० आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.
